# प्रकरण दुसरे

## भांडवल रचना

# प्रकरण दुसरे

# भांडवल रचना

**प्रस्तावना :**

सहकारी क्षेत्रात स्थापन होणाऱ्या प्रत्येक संस्थेस भांडवलाची आवश्यकता असते. सहकारी संस्थांचा मुख्य उद्देश नफा मिळविणे हा नसला तरी व सेवा पुरविणे हा असला तरी उद्दिष्ट पूर्ततेसाठी कोणते ना कोणते कार्य हाती घ्यावे लागते व ते भांडवलाशिवाय शक्य नसते.

२:१ **भांडवलाचे वर्गीकरण :-**

सहकारी संस्थांना भांडवल दोन मार्गाने उभा करता येते.

अ) **अंतर्गत भांडवल :** अंतर्गत भांडवलात संस्थेचे भागभांडवल, राखीव निधी व इतर निधींचा समावेश होतो. कित्येक वेळा सभासदांच्या ठेवींचा त्यात समावेश केला जातो.

ब) **बाह्य भांडवल :** बाह्य भांडवलात इतर विविध संस्थांकडून घेतलेल्या कर्जाचा समावेश होतो. या दोन्ही मार्गांनी जास्तीत जास्त भांडवल उभारण्याचा प्रयत्न केला जातो.

२:२ **कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेची भांडवल रचना :**

पतसंस्थेची नियमावली व उपविधीत नमूद केल्याप्रमाणे कासेगांव शिक्षण संस्थेच्या

सेवकांच्या सहकारी पतसंस्थेस खालील साधनांनी भांडवल जमा करता येते.

(१) भागाच्या रुपाने

(अ) सदस्यांकडून

(ब) (१) सरकारकडून

(२) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत

(२) ठेवीच्या व वर्गणीच्या रुपाने - सदस्यांकडून

(३) कर्जाच्या रुपाने.

(४) देणगीच्या रुपाने.

(५) प्रवेश फी च्या रुपाने.

२:३ **भाग भांडवल :**

"सहकारी संस्थेचे सभासद होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींना व संस्थांना सहकारी संस्थेचे भाग (शेअर) विकून जे भांडवल उभे केले जाते त्यास भाग भांडवल म्हणतात."

सहकारी संस्थेच्या घटनापत्रकात आणि पोटनियमात व्यवसायासाठी जास्तीत जास्त किती मर्यादेपर्यंत भाग भांडवल उभा करता येईल याचा उल्लेख असतो. या भांडवलास "अधिकृत भांडवल" असे म्हणतात. या अधिकृत भांडवलाचा काही भाग विक्रीस काढला जातो. या भांडवलास "विक्रेय भागभांडवल" असे म्हणतात. विक्रीस काढलेल्या भाग भांडवलांपैकी जेवढे लोकांनी खरेदी करावयाची तयारी दर्शविती असेल तेवढ्या भांडवलास "स्वीकृत भांडवल" असे म्हणतात. भागधारकांनी स्वीकारलेल्या भागांच्या

दर्शनी रक्कमेपैकी जेवढी रक्कम भागधारकांनी प्रत्यक्ष भरलेली असते आणि अशा रीतीने जेवढे भांडवल प्रत्यक्ष गोळा होते त्यास "वसूल भांडवल" म्हणतात.

कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेचे भाग भांडवल हे भांडवल उभारणीचे प्रमुख साधन आहे. भाग भांडवल हे सभासदांनी खरेदी केलेल्या भागांच्या रक्कमेच्या स्वरुपात जमा केले जाते. संस्थेच्या प्रत्येक भागाची दर्शनी किंमत १०=०० रुपये असून भाग भांडवलाची कमाल मर्यादा रुपये २०,००,०००/- आहे.

प्रत्येक सभासदाने कमीत कमी पांच भाग खरेदी केलेच पाहिजेत. तसेच प्रत्येक सदस्याने मासिक वेतनातून ५०/- रुपये वर्गणी भरलीच पाहिजे. सभासदाने धारण करावयाची भागाची कमाल मर्यादा ५,०००/- रुपये होईपर्यंत सदर वर्गणीची रक्कम भागाकडे वर्ग केली जाईल. तद्नंतर सदर वर्गणीची रक्कम सभासदांच्या नांवे कायमठेवीत वर्ग केली जाईल. कायम ठेवीवरती प्रत्येक वर्षी १२% व्याज दिले जाईल.

**भाग भांडवलातील वाढ :**

भाग भांडवलातील वाढ दोन घटकांवरती अवलंबून असते.

१) सभासद संख्या

२) एकूण दिलेली कर्जे

सभासद संख्येचा विचार करता प्रत्येक सभासद कमीत कमी पांच तरी भाग धारण करतो. त्यामुळे सभासद संख्येत वाढ झाल्यास एकूण भाग-भांडवल वाढते. तसेच सभासदांना दिलेल्या कर्जापैकी ठराविक रक्कम ही भागभांडवलात जमा केली जाते. त्यामुळे जेवढे कर्ज वितरण अधिक तेवढी भागभांडवलात वाढ होते.

कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेच्या भाग भांडवलातील वाढ पुढील कोष्टकात दर्शविली आहे.

कोष्टक क्रमांक २:१

## भागभांडवलातील वाढ

| अ.नं. | वर्षे | भागभांडवल (रुपये) | भागभांडवलातील वार्षिक वाढ(%) |
|---|---|---|---|
| १. | १९७४-७५ | उपलब्ध नाही | -- |
| २. | १९७५-७६ | ३५,४५०.०० | -- |
| ३. | १९७६-७७ | ८३,३२०.०० | १३५ |
| ४. | १९७७-७८ | १,१९,७३०.०० | ४४ |
| ५. | १९७८-७९ | १,५६,७३०.०० | ३१ |
| ६. | १९७९-८० | २,०५,३८०.०० | ३१ |
| ७. | १९८०-८१ | २,५१,८७०.०० | २३ |
| ८. | १९८१-८२ | ३,१२,७६०.०० | २४ |
| ९. | १९८२-८३ | ३,९०,७५०.०० | २५ |
| १०. | १९८३-८४ | ४,७४,२६०.०० | २१ |
| ११. | १९८४-८५ | ५,५१,६००.०० | १६ |
| १२. | १९८५-८६ | ७,६६,४३०.०० | ३९ |
| १३. | १९८६-८७ | ९,४६,६१०.०० | २४ |
| १४. | १९८७-८८ | ११,६२,७८०.०० | २३ |
| १५. | १९८८-८९ | १३,२८,६१०.०० | १४ |
| १६. | १९८९-९० | १४,८५,०५०.०० | १२ |
| १७. | १९९०-९१ | १६,२४,६६०.०० | ९ |
| १८. | १९९१-९२ | १७,६२,३५०.०० | ८ |

**आधार :**

कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेचे सन १९७६-७७ ते सन १९९१-९२ पर्यंतचे वार्षिक अहवाल.

सन १९७४-७५ ते १९९१-९२ या कालावधीत भागभांडवलाच्या रक्कमेत झालेल्या बदलाचा विचार करता असे दिसून येते की, काही वर्षाचा अपवाद सोडल्यास भागभांडवलात घटत्या दराने वाढ झाली आहे. याचे कारण सभासद संख्या मंद गतीने वाढलेली आहे. तसेच जुन्या सभासदांपैकी बहुसंख्य सभासदांची भागभांडवलाची कमाल मर्यादा पूर्ण झाली आहे. या काळात भाग-भांडवलात एकूण ४८७१% इतकी वाढ झालेली दिसते. व वार्षिक सरासरी वाढ २६.६१% इतकी झालेली आहे.

सन १९७६-७७ या वर्षात भागभांडवलात सर्वात जास्त वाढ झालेली दिसते याचे कारण या वर्षात सभासदांना केलेल्या कर्जपुरवठ्यात वाढ झाल्याने त्यांचेकडून कर्ज रक्कमेपैकी भागाकडे वर्ग झालेली रक्कम अधिक आहे.

सन १९७५-७६ या वर्षी प्रति सभासद भागभांडवल प्रमाण १७६.०० रुपये होते ते सन १९९१-९२ या वर्षी ४,५०७.०० रुपये इतके वाढले.

## २:४ खेळते भांडवल :

संस्थेच्या खेळत्या भांडवलात वसूल भागभांडवल, राखीव निधी, इतर निधी, ठेवी, बाह्य कर्जे, नफा, इतर देणी यांचा समावेश होतो. यामध्ये राखीव निधीचे प्रमाण एकूण भांडवलाच्या २५% असते. संस्थेच्या एकूण भांडवलातील वाढ ही कर्ज आणि व्यवहार यातील वाढ दर्शविते की, ज्यावर संस्थेची उत्पन्न मिळवून देण्याची क्षमता अवलंबून असते.

कोष्टक क्रमांक २:२

## खेळत्या भांडवलातील वाढ

| अ.नं. | वर्षे | खेळते भांडवल (रुपये) | खेळत्या भांडवलातील वार्षिक वाढ (%) |
|---|---|---|---|
| १. | १९७४-७५ | उपलब्ध नाही | -- |
| २. | १९७५-७६ | १,०६,२६७.०० | -- |
| ३. | १९७६-७७ | १,६८,७५३.०० | ५९ |
| ४. | १९७७-७८ | २,४०,९४०.०० | ४३ |
| ५. | १९७८-७९ | २,८९,२७०.०० | २० |
| ६. | १९७९-८० | ४,४६,६८२.०० | ५४ |
| ७. | १९८०-८१ | ५,४२,२३०.०० | २१ |
| ८. | १९८१-८२ | ७,२३,१८२.०० | ३३ |
| ९. | १९८२-८३ | १०,१६,०४१.०० | ४० |
| १०. | १९८३-८४ | ११,६४,००६.०० | १५ |
| ११. | १९८४-८५ | ११,६५,५५९.०० | ००.१३ |
| १२. | १९८५-८६ | २३,५१,४५७.०० | १०२ |
| १३. | १९८६-८७ | २७,४२,९३८.०० | १७ |
| १४. | १९८७-८८ | ३८,५८,२०५.०० | ४१ |
| १५. | १९८८-८९ | ४१,१०,६७०.०० | ७ |
| १६. | १९८९-९० | ५२,७३,२२५.०० | २८ |
| १७. | १९९०-९१ | ५६,८२,६७०.०० | ८ |
| १८. | १९९१-९२ | ६३,०१,२६४.०० | ११ |

*आधार :*

कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांची सहकारी पतसंस्थेचे सन १९७६-७७ ते सन १९९१-९२ पर्यंतचे वार्षिक अहवाल.

सन १९७४-७५ ते १९९१-९२ या काळात खेळत्या भांडवलाच्या रक्कमेत झालेल्या बदलाचा विचार करता असे दिसून येते की,या काळात एकुण खेळत्या भांडवलात ५८३० % वाढ दिसते. या कालावधीत खेळत्या भांडवलात वार्षिक सरासरी वाढ २७.७२% इतकी आहे. परंतु वरील कोष्टकातील टक्केवारीवरुन असे दिसते की, खेळत्या भांडवलातील वार्षिक वाढीत कोणतीही एक निश्चित दिशा नाही. खेळत्या भांडवलातील वाढीच्या दरातील असमतोलाचे प्रमुख कारण बाह्य कर्जातील बदल होय.

सन १९८४-८५ या वर्षी खेळत्या भांडवलातील वाढ फक्त ०.१३% दिसते. याचे मुख्य कारण यावर्षी संस्थेने घेतलेले बाह्य कर्ज मागील वर्षातील कर्जाशी तुलना करता ६३% नी घटले आहे.

सन १९८५-८६ या वर्षात खेळत्या भांडवलात सर्वात जास्त म्हणजे १०२% वाढ झालेली दिसते कारण या वर्षी संस्थेने घेतलेल्या बाह्य कर्जात मागील वर्षातील कर्जाशी तुलना करता ९६९% इतकी वाढ झालेली दिसते.

सन १९७५-७६ या वर्षी प्रति सभासद खेळते भांडवल ५२९.०० रुपये होते ते १९९१-९२ या वर्षी १६,११६.०० रुपये पर्यंत वाढले.

## २:५ बाह्य कर्जे :

सहकारी संस्थांना आपले व्यवहार मोठ्या प्रमाणावर वाढविण्यासाठी अंतर्गत साधने अपुरी पडतात. त्यामुळे आपली अल्पकालीन कर्जाची गरज भागविण्यासाठी त्यांना बाह्य कर्जाची मदत घ्यावी लागते. त्यासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व इतर वित्तीय संस्थांकडून कर्जे घेतली जातात. सहकारी संस्था ह्या मुळातच आर्थिक दृष्ट्या दुर्बल वर्गाच्या मालकीच्या असतात. त्यामुळे सभासदांनी गोळा केलेले भांडवल अपुरे पडते त्यामुळे अशा संस्थांना बाह्य कर्जे घ्यावीच लागतात.

पतसंस्थांची अंतर्गत साधने अपुरी असतात. त्यांची सभासद संख्या मर्यादित असते. तसेच सभासद हे नोकरदार वर्गातील असल्याने त्यांचे उत्पन्न मर्यादित असते. त्यामुळे त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात भांडवलाची उभारणी होवू शकत नाही. अशावेळी पतसंस्था बँकेकडून कर्जे घेतात. परंतु या कर्जावरती १३ ते १६% व्याज द्यावे लागत असल्याने ही कर्जे महाग पडतात. त्यामुळे पतसंस्था सभासदांना कमी व्याजदरात कर्ज पुरवठा करु शकत नाहीत. तरी सुध्दा वाढती मागणी लक्षात घेवून संस्थेस वेळोवेळी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून कर्ज घ्यावेच लागते.

कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांची सहकारी पतसंस्था लि., कासेगांव ही सुध्दा सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून कर्ज घेवून सभासदांची वाढती कर्जाची मागणी पूर्ण करते.

पतसंस्थेच्या स्थापनेनंतर सन १९७५-७६ पासून त्या त्या वर्षी कर्ज परत करणेच्या अटीवरती सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेने "बँक क्लिन कॅश क्रेडीट" या खात्यावरती कर्ज देण्यास सुरवात केली आहे. सुरवातीस ही मर्यादा ६०,०००/- रुपये इतकी होती. नंतर ती मागणीनुसार वाढून २०,००,०००/- रुपये इतकी केली गेली.

संस्थेने घेतलेल्या कर्जाचे स्वरुप पुढील कोष्टकावरुन स्पष्ट होते.

**कोष्टक क्रमांक २।३**

## सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून घेतलेले कर्ज

| अ.नं. | वर्षे | कर्ज रक्कम (रुपये) | कर्ज रक्कमेतील वार्षिक वाद (%) |
|---|---|---|---|
| १. | १९७४-७५ | उपलब्ध नाही | -- |
| २. | १९७५-७६ | २८,५२२.०० | -- |
| ३. | १९७६-७७ | ५२,१८३.०० | ८३ |
| ४. | १९७७-७८ | ७९,३७५.०० | ५२ |
| ५. | १९७८-७९ | ७७,५१५.०० | -२ |
| ६. | १९७९-८० | १,७३,०७९.०० | १२३ |
| ७. | १९८०-८१ | १,७७,६७६.०० | ३ |
| ८. | १९८१-८२ | २,१३,४४२.०० | २० |
| ९. | १९८२-८३ | ३,०२,९०७.०० | ४२ |
| १०. | १९८३-८४ | २,४९,८७३.०० | -१८ |
| ११. | १९८४-८५ | ९३,५९९.०० | -६३ |
| १२. | १९८५-८६ | १०,००,४२३.०० | ९६ |
| १३. | १९८६-८७ | ११,८२,८५७.०० | १८ |
| १४. | १९८७-८८ | १८,५८,९७३.०० | ५७ |
| १५. | १९८८-८९ | १८,९९,९७९.०० | २२ |
| १६. | १९८९-९० | १९,९५,२९२.०० | ५ |
| १७. | १९९०-९१ | १८,४५,७१४.०० | -७ |
| १८. | १९९१-९२ | १६,४५,०१४.०० | -११ |

***आधार:***

कासेगांव शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्था चे सन १९७६-७७ ते सन १९९१-९२ पर्यंतचे वार्षिक अहवाल.

संस्थेच्या स्थापनेपासून सभासदांची कर्जाची मागणी पूर्ण करण्यास अंतर्गत भांडवल उभारणीचे मार्ग अपूरे ठरत असल्याने संस्थेस सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून कर्ज घ्यावे लागले.

सन १९७४-७५ ते १९९१-९२ या कालावधीत सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून घेतलेल्या कर्जाचा विचार करता असे दिसून येते की, संस्थेने गरजेनुसार कमी अधिक कर्ज घेतले आहे. या कालावधीतील कर्ज रकमेतील वार्षिक वाढ विचारात घेता असे दिसून येते की, काही वर्षात कर्ज मागणी खूपच अधिक तर काही वर्षात खूपच कमी दिसते.

सन १९७९-८०, १९८५-८६ या वर्षात सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून घेतलेल्या कर्जात अनुक्रमे १२३% व ९६९% अशी वाढ झालेली दिसते. याचे कारण या वर्षात सभासदांना संस्थेने केलेल्या कर्ज पुरवठ्यात अनुक्रमे ७३% व १५७% वाढ झालेली दिसते.

सन १९७८-७९, १९८३-८४, १९८४-८५,१९९०-९१ व १९९१-९२ या वर्षात सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून घेतलेल्या कर्जात अनुक्रमे २%, १८%, ६३%, ७%, ११% घट झालेली दिसते याचे कारण या वर्षात कर्जाची मागणी प्रामुख्याने अंतर्गत भांडवल उभारणीच्या द्वारे पूर्ण केलेली दिसते.

सन १९७५-७६ या वर्षी सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून घेतलेले प्रती सभासद कर्ज १४२.०० रुपये होते ते सन १९९१-९२ या वर्षी ४२०७.०० रुपये झाले.